# घराणे ९ : रावडी
## वंशावळ क्र. १, पृष्ठ क्रमांक ९६

**अधिक माहिती – घराणे ९ :** हे घराणे मूळचे कसबा – संगमेश्वर येथील देवपाट भागातले. तालुका – संगमेश्वर, जिल्हा – रत्नागिरी. चिपळूणपासून ४५ कि. मी. अंतरावर कसबा-संगमेश्वर मधील काळभैरव मंदिराच्या समोर दोन डोंगर दिसतात. त्यातील समोरच्या डोंगरावर साने घराण्याचे वसतिस्थान आहे. मोगलकाळात मुस्लिमांनी कोकणवासी हिंदूंना अनेक प्रकारे त्रास देऊन त्यांचा छळ केला. अनेक कुटुंबांना सक्तीने बाटवून धर्मांतर करण्यास भाग पाडले. नाईलाजास्तव अनेक कुटुंबांनी मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्म स्वीकारला. आजही तेथे करंदीकर, दामले या आडनावांची मुस्लिम कुटुंबे राहात आहेत. अनेक कुटुंबांत गणपतीची उपासना चालते. या त्रासामुळे अनेक कुटुंबे उदरभरणासाठी बाहेर पडून देशावर आली. पेशवाईच्या काळात हे स्थलांतर सुरू झाले असावे. स्थलांतराचा हा ओघ मुख्यतः पुणे आणि आसपासच्या भागात स्थिरावला असावा. ४ ते ५ पिढ्यांपूर्वी हे घराणे स्थलांतरित होऊन त्यावेळच्या भोर संस्थानात (ता. भोर, जि. पुणे) रावडी या खेड्यात स्थिरावले. या घराण्याच्या ४-५ कुटुंबांव्यतिरिक्त कोकणातील जोशी, गोखले, दामले ही घराणीही रावडी येथे आली असावीत. या सर्व घराण्यांचे रावडी – चिखलागांव या परिसरात शेती हेच उदरनिर्वाहाचे मुख्य साधन होते.

कुलदेवता व कुलधर्म – कुलाचार : ग्रामदेवता कालभैरव-बहिरोबा-भैरीभवानी – कुलदेवता जोगेश्वरी. श्री गणपती कुलदैवत असल्याने गणपतीची उपासना आहे. देवघरातील टाकाच्या देवीचे नवरात्र असते. देवीला नवरात्रात एकाच ठिकाणी ठेवून रोज फुलांची माळ व नऊ दिवस सतत तेलाची समई असते.

सत्यनारायणाच्या पूजेची या घराण्यांत प्रथा नाही. नवरात्रात अष्टमीच्या पूजेची प्रथा नाही. घागर फुंकण्याची पद्धत नाही. वाजणारे घुंगरू वापरायचे नाहीत. काळे वस्त्र शक्यतो वर्ज्य.

डोहाळ जेवण्याची पद्धत नाही. डोहाळ जेवणाला जाता येते मात्र आहेर करायचा नाही. बारशाला आहेर करायचा.

बोडण हे फक्त मुलगा झाल्यास बारशाचे, मुंजीचे व लग्नाचे भरतात. बोडणाबरोबर गोंधळाची पद्धत आहे. मुलाच्या मुंजीला व लग्नाचा गोंधळ असतो. बारशाला नाही.

**पिढी** ४ चिंतामण
|
५ विश्वास
|
६ मंदार
|
७ आर्य

**विश्वास चिंतामण.** जन्म – १७/५/१९४१. स्थळ : पुणे. विवाह : २१/४/१९६९. शिक्षण- बी.ए. (अर्थशास्त्र). निवृत्त रजिस्ट्रार, M.E.S. आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे – ४ (३० वर्षांच्या सेवेनंतर). रक्तगट – O +ve. पत्ता : ५, अमित अपार्टमेंट, कृष्णा कॉलनी, गल्ली नं. ११, परमहंसनगर, पौड रोड, वनाझ कंपनीसमोरील भाग, कोथरूड, पुणे ४११०२९. फोन – ०२०-२५३८१४४४. मोबाईल – ९४०३१८५७४५. ललिता (लता). जन्म – २४/६/१९४५. स्थळ – श्रीगोंदा. शिक्षण : एफ्.वाय्.बी.ए. एस्.टी.सी. नोकरी – पुणे टेलिफोन्समधून टेलिफोन सुपरवायझर (TSO) या पदावरून ३४ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त. पत्नीचे वडील : दत्तात्रय सीताराम गोखले. गाव – अहमदनगर. कन्या (१) – वर्षा. जन्म – ११/८/१९७१. स्थळ : अहमदनगर, विवाह – १८/११/१९९७. शिक्षण – एम्.ए. बी. एड्. (हिंदी). नोकरी –

सिंबॉयोसिस संस्थेच्या प्रभात रोडवरील शाळेत शिक्षिका, एम्.फिलचा शिक्षणक्रम चालू. रक्तगट : O +ve. पती : शिरीष जोशी. पत्ता : डी-१४, ऑर्नेट पार्क सोसायटी, बलवंतपुरम्, शिवतीर्थनगर, कोथरूड, पौडरोड, पुणे - ४११०३८.

**मंदार विश्वास.** जन्म - २६/८/१९७५. स्थळ : पुणे. विवाह : २२/११/२०००. शिक्षण :D.M.E. (इंजिनिअरिंग). भोसरी येथे फॅब्रिकेशन व्यवसाय, स्वतःची कंपनी SUPREET ENGG. PVT. LTD. रक्तगट : O +ve. पत्ता : डी-१४, ऑर्नेट पार्क सोसायटी, बलवंतपूरम, शिवतीर्थनगर,पौड रोड, कोथरूड, वनाझ कंपनीसमोर, पुणे ४११०३८. मोबाईल : ९४२२३५६४३१, ९२२५६२८९००. पत्नी - सुप्रिया. जन्म : २/७/१९७८. स्थळ : पुणे. बी. कॉम, एम्सीएम्. नोकरी : कमिन्स सेल्स अँड सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, एरंडवणा, पुणे - ४११०३८. (आय.टी.विभाग). रक्तगट : वडील : लक्ष्मण बडवे. नेवासा. पुत्र : आर्य.

**आर्य मंदार.** जन्म : ३/८/२००७. जन्मस्थळ : पुणे.